राज्य उत्पादन शुल्क विभागातील कार्यालय अधीक्षक (गट-क) संवर्गातील अधिकाऱ्यांना सहायक आयुक्त (गट-ब) या संवर्गात देण्यात येणाऱ्या पदोन्नतीबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन आदेश क्रमांक:- इएसटी-२७१४/ प्र.क्र.१८९/राउशु-१,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ०३ जून, २०१९.

शासन आदेश -

राज्य उत्पादन शुल्क विभागातील कार्यालय अधीक्षक (गट-क) या संवर्गातून सहायक आयुक्त (गट-ब) या संवर्गात पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१५-१६ च्या पदोन्नतीसूचीमधील खालील अधिकाऱ्यांस विहीत अटींच्या अधीनतेने सहायक आयुक्त (गट-ब) या संवर्गात खुल्या प्रवर्गातून पदोन्नती देण्यात येत असून, सदर पदोन्नतीनंतर, त्यांची त्यांच्या नावासमोर (स्तंभ ४ येथे) दर्शविण्यात आलेल्या महसूली विभागामध्ये (स्तंभ ५ येथे) दर्शविण्यात आलेल्या रिक्त ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे.

अ. .क्र	अधिकाऱ्याचे नाव	मूळ प्रवर्ग	वाटप करण्यात आलेला महसूली संवर्ग	पदोन्नतीनंतर देण्यात येणारी पदस्थापना
१	**२**	**३**	**४**	**५**
१	श्रीमती रेखा भा. पाटील	वि.मा.प्र.	औरंगाबाद	सहायक आयुक्त, विभागीय उप आयुक्त, राउशु, औरंगाबाद यांचे कार्यालय.

सदर पदोन्नती ही, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात, सेवाज्येष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातील पदांवर मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधीन राहून तसेच पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) सदरची पदोन्नती ही प्रशासकीय निकड म्हणून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील पदोन्नती राहील.

२) सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरूपात असून सदर पदावर संबंधित अधिकाऱ्यांचा कायमस्वरूपी धारणाधिकार रहाणार नाही.

३) सन २०१५-१६ या निवडसूचीतून पदोन्नती देण्यात आलेल्या उक्त अधिकाऱ्यांस नियमित पदाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

४) निवडसूचीतील उक्त अधिकाऱ्यांनी दि.२५.०१.१९९९ अन्वये विहीत केलेले म.ना.से. (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम, १९९९ व दिनांक

२८.०५.२०१८ अन्वये विहीत केलेले (सुधारणा) नियम, २०१८ नुसार संगणक परीक्षा उत्तीर्ण केली आहे याची आयुक्त, राउशु यांनी खातरजमा करावी.

५) संबंधित कार्यालय अधीक्षक (गट-क) यांची सहायक आयुक्त (गट-ब) या पदावरील पदोन्नती ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

६) सदर कार्यालय अधीक्षक (गट-क) यांची सहायक आयुक्त (गट-ब) या पदावरील पदोन्नती ही संबंधित अधिकाऱ्यांविरूद्ध प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे. आयुक्त, राउशु यांनी याची खातरजमा करावी.

७) मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांची पदोन्नती ही शासन निर्णय दिनांक २५.०५.२००५ मधील तरतूदींनुसार त्यांना आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत तसेच सदर अधिकाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जातपडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. आयुक्त, राउशु यांनी याची खातरजमा करावी.

८) महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणातील तरतूदींनुसार पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण घेणे संबंधित पदोन्नत अधिकाऱ्यांवर बंधनकारक राहील. सदर अधिकाऱ्यांना पदोन्नतीनंतर प्रशिक्षण देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही आयुक्त, राउशु यांनी करावी व तसा अहवाल सादर करावा.

सदर अधिकाऱ्याने पदोन्नतीचा स्वीकार करून, पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रूजू व्हावे. संबंधित अधिकाऱ्यांस उपरोक्त पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत आयुक्त, राउशु यांनी शासनास त्वरीत कळवावे.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१९०६०३१५४३५६९१२९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

P H WAGDE

Digitally signed by P H WAGDE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=26d7295f0f289d96eecb9e12c2850ebd4f894edc0ea69760a3c1561515a6bf87, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=P H WAGDE
Date: 2019.06.03 15:52:11 +05'30'

(पु.हि.वागदे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई .

२) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई व नागपूर.

३) मा.मंत्री(राउशु) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.

४) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद.
६) संबंधित अधिकारी.
७) कक्ष अधिकारी, राउशु-२/राउशु-३, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती-(राउशु-१).